अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

# भगवंत आणि भक्ताच्या भेटीचा कौतुकसोहळा

भेटीलागी जीवा लागलीसे आस। पाहे रात्रंदिवस वाट तुझी।
पौर्णिमेचा चंद्र चकोरा जीवन । तैसे माझे मन वाट पाहे।
दिवाळीच्या मुळा लेकी आसावली । पहातसे वाटुली पंढरीची।

दिवाळीनंतर कार्तिक महिन्यात येणारी प्रबोधिनी एकादशी म्हणजे विठ्ठल भक्तांसाठी चंद्रभागेवरच्या तीरावरचा कौतुक सोहळाच असतो. आषाढी एकादशीला अवघा महाराष्ट्र विठ्ठलमय होतो. तर कार्तिकी एकादशीला चातुर्मास संपल्यानंतर पुन्हा त्याच पांडुरंगाचे मनोमन दर्शन घेण्यासाठी हा विठ्ठल भक्त आतुरलेला असतो. ज्याप्रमाणे दिवाळीसाठी एखादी सासुरवाशीण माहेरी जाण्याकरिता आसुसलेली असते तीच अवस्था दिवाळीनंतरच्या या कार्तिकी एकादशीला समस्त विठ्ठल भक्तांची होते. पंढरपूरचा महिमा वर्णावा किती अशी सगळयाच संतांची संभ्रमावस्था दिसून येते. पुंडलिकाच्या भेटीसाठी हे परब्रह्म पंढरीमध्ये अवतरले. तेव्हापासून पंढरपूरला महत्त्व प्राप्त झाले. खरे सांगायचे तर पंढरपूरला विठ्ठलाचे मंदिर आहे म्हणून जितके स्थानमहात्म्य आहे. त्यापेक्षाही तिथे जमणाऱ्या भक्तांच्या भवसागरामुळे पंढरपूर अधिक तीर्थमय होते यात काही शंका नाही. कदाचित, म्हणूनच आषाढी आणि कार्तिकी अशा दोन्ही एकादशींना लाखो विठ्ठल भक्तांचा नामाचा गजर तिथे दुमदुमत असतो. विठ्ठल आपल्या भक्तासाठी तिथे धावून आला. याचेच अप्रुप सर्वांनाच वाटत असते आणि म्हणून सगळेच विठ्ठल भक्त पंढरपुराला धावून जातात कारण प्रत्यक्ष पांडुरंगच या भक्तांच्या दर्शनासाठी तिथे अवतरत असतो. म्हणूनच सगळया संतांनी आपापल्या अभंगामध्ये तिथे जिवाभावाची भेट घडते आणि साक्षात माऊली तिथे भक्तांसाठीच अवतरते अशी त्यांची श्रध्दा आहे. केवळ श्रध्दाच आहे असे नाही तर पराकोटीची निष्ठादेखील आहे. अशा या कार्तिकी एकादशीसाठी पुन्हा एकदा विठुनामाचा गजर होतो आहे. महाराष्ट्राच्या पुण्यभूमित भक्तीची ही गंगा सर्वांनाच पावन करीत आहे. शेकडो वर्षांपासून आषाढी कार्तिकीची परंपरा अखंडपणे सुरू आहे. त्यावरून एक गोष्ट आपोआप सिद्ध होते. या सगळया विठ्ठल भक्तांना मनुष्य जन्माचे सार्थक कशात आहे याची अनुभूती मिळते. कोणत्याही समाजामध्ये एखादी परंपरा शेकडो वर्ष टिकते. याचा अर्थ ती निस्वार्थी निष्ठेच्या पायावर उभी असते.

## भक्ती भौतिक सुखासाठी नाही

आपल्या भारतीय संस्कृतीचे एक फार मोठे वैशिष्ट्य आहे की, इथे भक्ती केवळ भौतिक सुखाच्या प्राप्तीसाठी केली जात नाही. तर मिळालेले भौतिक सुख टिकविण्यासाठी या भक्तीचा उपयोग होत असतो. कारण अध्यात्मामध्ये त्याग किंवा वैराग्य याला महत्त्व आहेच. परंतु, समाजामधल्या प्रपंच किंवा संसार करणाऱ्या सामान्य माणसाला अशा प्रकारचा त्याग किंवा वैराग्य स्वीकारणे शक्य होत नाही. प्रपंचात राहूनच भक्तीचे सुख अनुभवता येते. कदाचित अशा संसारी जिवांना मोक्ष प्राप्ती होणार नाही पण जिवंतपणी मुक्ती सोहळा काय असतो, याची अनुभूती घेता येईल अशी व्यवस्था भारतीय संस्कृतीने करुन ठेवली आहे. चंद्रभागेच्या तीरावर अनेक प्रकारचा सुखाचा त्याग करून जमणारा वारकरी प्रत्यक्ष एका वेगळया मुक्तीचा अनुभव घेतो. प्रत्येक वारकरी एकमेकांच्या पाया पडतो आणि 'माऊली' म्हणून प्रत्येकामध्ये असलेल्या भक्ताचे दर्शन घेत असतो. म्हणूनच लाखो भक्त जेव्हा वारीसाठी येतात. तेव्हा आपली जन्ममरणाची फेरी चुकविण्यासाठी या कैवल्यसुखाचा आनंद उपभोगतात. वारी किंवा त्यामध्ये असलेल्या दिंडया म्हणजे केवळ मिरवणुका नसतात तर त्या फार मोठ्या जीवनतत्त्वाचे धडे गिरवत असतात. कुठेही ज्ञानाचा टेंभा न मिरविता अतिशय शरणागत भावनेने हा वारीचा सोहळा होत असतो आणि एकमेकांना सार्थकतेचा अनुभव देत असतो. या गोष्टी बुध्दिच्या कसोटीवर कितीही तपासून घेण्याचा प्रयत्न केला तरी त्याचा उलगडा होणार नाही त्यासाठी भक्तीची आत्मिक वृत्तीच लागेल.

## भक्तीचे आनंदनिधान

कुठेतरी हा अनुभव इतका खोलवर रुजला असावा किंवा संतांना तसे आत्मदर्शन घडले असावे, म्हणूनच एकादशीचे व्रत कुणीही टाकून दिलेले नाही. उलट अधिकाधिक निष्ठेने जपण्याचा प्रयत्न होत आहे. चोखोबा महाराजांनी या विठ्ठलाला पंचप्राणांच्या ज्योतीने ओवाळून आरती करावी असा भाव व्यक्त केला. ते म्हणतात,

माझ्या विठोबाचे गाती जे नाम। ते माझे सुखधाम वारकरी।
विठोबा पाहुणा आला आमुच्या घरा। लिंबलोण करा जिवेभावे।
पंचप्राण ज्योती ओवाळून आरती। ओवाळीला पती रुखमाईचा।

अशा प्रकारचा दृढभाव असल्यामुळेच संतांनी दिलेले संचित आजही वारकऱ्यांनी टिकवून ठेवले आहे. आयुष्यामध्ये मनुष्य नेहमीच स्वार्थासाठी कष्ट करतो संसार करण्यासाठी घाम गाळतो. आप्तस्वकियांसाठी धडपडत असतो परंतु, कुठेही मनाला समाधान मिळत नाही. अशावेळेला परमेश्वर भेटीची तळमळ उफाळून येते. नातेवाईकांच्या प्रेमापेक्षा देवाशी जवळीक करावी अशी भाववृत्ती जागी होते. त्या भाववृत्तीचे साक्षात् दर्शन म्हणजेच चंद्रभागेवरचा हा सुखसोहळा असतो. दिंड्यापताका घेऊन नाचणारे हे वैष्णव विठुनामामध्ये तल्लीन होतात कारण देहभान विसरुन त्यांना परमेश्वर भेटीचे आत्मभान झालेले असते. ज्ञानेश्वर, तुकाराम, जनाबाई, चोखामेळा, निळोबा, नामदेव, संत एकनाथ अशा कितीतरी संतांनी या विठ्ठल भक्तीसाठी आपले आयुष्य खर्च केले आणि खऱ्या जीवनमुक्तीचा अनुभव घेतला. जन्माला आलेल्या प्रत्येक माणसाला सुखासाठी धावपळ करावीच लागते पैसा मिळवावाच लागतो. परंतु, या सगळया गोष्टी परमेश्वर प्राप्तीसाठी आहेत. याची आठवण म्हणजेच या एकादशीचे पुण्यस्मरण म्हणायला हवे. शेवटी कुठलीही समाजव्यवस्था टिकून राहायची असेल तर ती या भावनिक समाधानावर अवलंबून असते. भौतिक सुखाची कितीही लयलूट झाली तरी मनुष्याचे मन कुठेतरी अशा आत्मिक समाधानाच्या शोधात असते. सुदैवाने भारतीय संस्कृतीत या गोष्टीचा सखोलपणे विचार झाला आणि भक्तीचे आनंदनिधान आपल्याला उपलब्ध झाले.